RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

**आरबीआय/२०१०-११/३०७** **डिसेंबर १०, २०१०**
**आरपीसीडी.सीओ.आरसीबी.एएमएल.बीसी. क्र. ३७/०७.४०.००/२०१०-११**

सर्व राज्य व केंद्रीय सहकारी बँकांचे मुख्य कार्याकारी अधिकारी

महोदय,

**तुमचा ग्राहक जाणा (केवायसी) मार्गदर्शक तत्वे - पगारदार कर्मचारी**

कृपया आमचे परिपत्रक आरपीसीडी.एएमएल.बीसी.क्र.८०/०७.४०.००/२००४-०५ दि. फेब्रुवारी २००५ सोबत जोडलेल्या "तुमचा ग्राहक जाणा" निषक आणि अँटी मनी लॉंडरिंग मेझर्स' वरील मार्गदर्शक तत्वांच्या जोडपत्र २ चा संदर्भ घ्यावा. त्यात आम्ही, बँक खाती उघडण्यासाठी, ग्राहकाची ओळख व पत्ता पडताळून पाहण्यासाठी विश्वसनीय ठरविलेले कागदपत्र/माहिती ह्याची एक यादी दिली होती.

२) आमच्या नजरेस असे आणून देण्यात आले आहे की, पगारदार कर्मचाऱ्यांची खाती उघडण्यासाठी, ओळख व पत्त्याचा पुरावा म्हणून, काही बँका, कंपन्यांच्या मालकांनी दिलेले प्रमाणपत्र/पत्र हेच ओळख व पत्त्याचा पुरावा म्हणून एक केवायसी -डॉक्युमेंट म्हणून त्यावर विश्वास ठेवतात. असे करणे म्हणजे दुरुपयोग व धोका ह्यांना आमंत्रण ठरु शकते. ह्यासाठी येथे स्पष्ट करण्यात येत आहे की, फसवाफसवीचा धोका टाळण्यासाठी बँकांनी केवळ कॉर्पोरेट्स व विख्यात संस्थांच्या प्रमाणपत्रांवरच विश्वास ठेवावा व ती संबंधित मालकांनी त्यासाठी नेमलेल्या सक्षम प्राधिकरणांनीच दिली आहेत ह्याची खात्री करुन घ्यावी. ह्याशिवाय मालकांनी दिलेल्या प्रमाणपत्राव्यतिरिक्त, बँकांनी, प्रिव्हेंशन ऑफ मनी लॉंडरिंग रुल्समध्ये दिलेल्या किमान एका कागदपत्राचा (उदा. पासपोर्ट, ड्रायव्हिंग परवाना, पॅन कार्ड, मतदार ओळखपत्र इत्यादि) किंवा युटिलिटी बिलांचा आग्रह, कॉर्पोरेट्स आणि अन्य सस्थांच्या पगारदार कर्मचाऱ्यांची बँकखाती उघडतेवेळी केवायसी बाबत धरावा.

ग्रामिण योजना व कर्ज विभाग, केंद्रीय कार्यालय, १०वा मजला, केंद्रीय कार्यालय इमारत, पो.बॉ.क्र. १००१४ मुंबई ४००००१
टेलि.क्र. ९१-२२-२२६०१०००/फेक्स -९१-२२-२२६२१०११/२२६५८२७३/२२६५८२७६ ई-मेल - **cgmicrpcd@rbi.org.in**

३) ही मार्गदर्शक तत्वे पुढील संदर्भाच्या अनुसार दिली गेली आहेत - बँकिंग रेग्युलेशन अधिनियम,१९४९ (सहकारी सोसायट्यांना लागु असणारा) च्या कलम ३५ अ खाली प्रिव्हेंशन ऑफ मनी लॉंडरिंग (मेंटेनन्स ऑफ रेकॉर्ड्स ऑफ दि नेचर अँड व्हॅल्यु ऑफ ट्रॅन्झॅक्शन्स, दि प्रोसिजर अँड मॅनर ऑफ मेंटेनिंग अँड टाईम फॉर फर्निशिंग इन्फर्नेशन अँड व्हेरिफिकेशन अँड मेंटेनन्स अँड रेकॉर्ड्स ऑफ दि आयडेटिटी ऑफ दि क्लायंट्स ऑफ दि बँकिंग कंपनीज्, फायनान्शियल इन्स्टिटयुशन्स अँड इंटरमिडिअरिज) नियम, २००५ च्या नियम ७ खाली. ह्याबाबतचे उल्लंघन किंवा अनुपालन न करणे हे, ह्या अधिनियमाखाली दंडनीय ठरेल.

४) कृपया पोच आमच्या संबंधित प्रादेशिक कार्यालयाला, द्यावी.

आपला

(बी.पी. विजयेंद्र)
मुख्य महाव्यवस्थापक